
१६

# डॉक्टर आंबेडकर

दो. श्री. शेषराघवाचार



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : व्या.वा
दा. क्र. ७३२२

BVBK-0401322

# डॉ. भीमराव आंबेडकर

लेखक

**डी. एस. शेषराघवाचार**

अनुवादक

**वि. मा. सालोडकर**

BVBK-0401322

मुख्य संपादक

**एल. एस. शेषगिरिराव**

**भारत-भारती (मराठी संस्करण)**

रुईकर पथ, महाल, नागपूर–२

प्रकाशक
भारत-भारती (मराठी संस्करण) बाल पुस्तकमाला

प्रभाकर फैजपूरकर
मंत्री
श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती
रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

संपादक–मराठी संस्करण
सुरेश दत्तात्रेय देशपांडे

प्रथम संस्करण फेब्रुवारी १९८१

किंमत रु. २–००

मुद्रक
चंद्रकांत तापस
श्री प्रसाद मुद्रण, ८, वर्धा मार्ग, नागपूर–१२

# थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्रोत. त्यांच्या जीवनाच्या अभ्यासातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना, आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या 'राष्ट्रोत्थान परिषदे 'ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोटया–छोटया पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत.

नागपूरच्या 'श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती 'ने या चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित

करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी साऱ्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

आपला हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपल्यालाही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमास लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत


**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

सम्पादक

# डॉ. भीमराव आंबेडकर

एकदा शाळेत शिकणारे दोन विद्यार्थी आपल्या वडिलांना भेटण्याकरिता स्वत:च्या गावी येण्यास निघाले. मसूर स्टेशनवर गाडी पोचताच दोघेही उतरले व पुढे जाण्याकरिता त्यांनी एक किरायाची बैलगाडी केली. थोडे दूर गेल्यानंतर गाडीवाल्याला कळले की आपल्या गाडीत बसलेली दोन्ही मुले महार आहेत. त्याने लगेच गाडी थांबविली व समोर येऊन गाडीचे जू वर उंच केले. त्याबरोबर ती दोघेही एकदम गाडीच्या खाली पडली. एवढ्यावरच गाडीवाल्याचा राग शांत झाला नाही. त्याने स्वत:चे समाधान होईतोपर्यंत त्यांना जोरजोराने खूप शिव्या दिल्या.

दुपार होऊन गेली होती. त्या दोघाही भावांना खूप तहान लागली. पण कोणीही त्यांना प्यायला देखील थोडेसे पाणी दिले नाही. दोन तास ते तहानेने तसेच व्याकूळ राहिले. जवळच्या तलावाजवळही



दोन्ही मुले एकदम गाडीच्या खाली पडली.

त्यांना लोकांनी फिरकू दिले नाही.

ह्यापैकी लहान भावाचे नांव भीमराव आंबेडकर असे होते. एक दिवस ह्या भीमरावला अत्यंत जोराची तहान लागली. म्हणून जवळच्या विहीरीचे पाणी काढून तो प्याला. पाणी पिताना कोणीतरी त्याला पाहिले. थोड्याच वेळात तेथे लोकांची गर्दी जमली व त्याला त्यांनी निर्दयतेने खूप चोपून काढले.

एक दिवस भीमरावला केस कापायचे होते. चांगला न्हावी तर सोडून द्या, कामचलाऊ न्हावी देखील त्याला हात लावायला तयार होईना; केस कापणे दूरच राहिले.

आणखी अशीच घटना एक दिवस घडली. भीमराव शाळेत जात होता. मुसळधार पाउस पडत होता. ओले होऊ नये म्हणून एका घराच्या भिंती-जवळ, आडोशाकरिता तो उभा राहिला. घरमाल-कीणीने त्याला पाहिले मात्र; रागाने कावरीबावरी होऊन तेवढ्या पावसात तिने त्याला असा जोराने धक्का दिला, की त्यामुळे तो चिखलात पडला व त्याची पुस्तकेही पावसाने ओली झाली.

अशा प्रकारच्या अपमानाचे असंख्य अनुभव त्याला आपल्या जीवनात सहन करावे लागले. परिणामत: कोंडलेल्या कटू भावनामुळे त्याचे मन एखाद्या स्फोटा-पूर्वीच्या ज्वालामुखी पर्वताप्रमाणे भासू लागले.

त्या विचाऱ्या मुलाशी आपल्याच समा-जातील लोकांनी असा दुष्ट व्यवहार कां बरे करावा? त्याने काही गुन्हा केला होता काय ? मुळीच नाही. तो महार होता एवढाच त्याचा अपराध. एका हीन जातीत जन्म पावला म्हणून त्याला आपण स्पर्श देखील करू नये, असे इतर जातीच्या लोकांना वाटे. महार जातीप्रमाणे अशा किती तरी जाती आपल्या देशात आहेत. त्या अस्पृश्य मानल्या गेल्या-मुळे हजारो वर्षांपासून त्यांच्याशी ही अन्यायाची वागणूक सतत चालू आहे.

## अन्याय थांबविण्याचे प्रयत्न

आपल्या समाजात वैदिक काळी जातिव्यवस्था नव्हती व म्हणूनच अस्पृश्यता देखील नव्हती. ह्या रोगानं आपल्या समाजात केव्हा प्रवेश केला हे, नक्की सांगता येणार नाही.

तर मग ह्या अन्यायाविरुद्ध कोणीही कधीच ओरड केली नाही ? तो दूर करण्याचा कोणीही प्रयत्नच केला नाही ?

केला नाही असे नाही. पुष्कळशा अस्पृश्यांना भगवान बुद्धाने आपल्या धर्माची दीक्षा दिली. रामानुजाचार्य, वसवेश्वर, चक्रधर, रामानन्द, कबीर, चैतन्य, एकनाथ, तुकाराम, राजा राममोहन राय ह्याशिवाय इतरही महापुरुषांनी "आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत" असा उपदेश केला. आपल्यात कोणीही नीच नाही, कोणीही उच्च नाही, अशी शिकवण दिली. महात्मा फुल्यांनी व त्यांच्या पत्नीने आपले संपूर्ण जीवन अस्पृश्यांच्या शिक्षणाकरिताच अर्पण केले. पुष्कळ पूर्वी सन १८८३ मध्ये बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी अस्पृश्यांकरिता एक शाळा उघडली. हिन्दू समाजातील अनेक विचारी पुढारी अशाप्रकारे शेकडो वर्षांपासून अस्पृश्यता नष्ट करण्याकरिता सतत प्रयत्न करीत आले आहेत.

भारत स्वतंत्र होण्याच्या पूर्वी व नंतर देखील कितीतरी महापुरुषांनी सत्याकरिता व आपापल्या

विविध सिद्धान्तांकरिता स्वत:च्या जीवनाचे बलिदान केले. डॉ. भीमराव आंबेडकर देखील अशाच महापुरुषां-पैकी एक होते.

हिंदूमध्ये उच्चनीचतेची भावना फार खोलवर रुजलेली होती. ह्या भावनेमुळेच आंबेडकरांना पुष्कळ यातना व कष्ट सहन करावे लागले. ह्या भेदभावाच्या विरोधात ते एखाद्या खडकाप्रमाणे उभे राहिले आणि शेवटी स्वतंत्र भारताचे विधिमंत्री झाले. अस्पृश्यते-विरुद्ध कायदा करण्याचे व ती नष्ट करण्याकरिता आवश्यक वातावरण निर्माण करण्याचे श्रेय डॉ. आंबेडकरांनाच आहे.

## प्रारंभिक जीवन

महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्हयात आंबावाडे नावाचे एक गांव आहे. ह्याच गांवातील रामजी सक-पाल नामक एका रहिवाशाचे ते चिरंजीव होत. आपल्या आईवडिलांचे ते चौदावे अपत्य.

रामजी, संतकबीराचे मोठे भक्त होते. भगवंताची भक्ती हीच मानवी जीवनात सर्वात श्रेष्ठ वस्तू आहे, असे संत कबीराचे म्हणणे होते. जातपात व धर्म

यांच्यावर आधारलेल्या भेदभावांवर रामजीचा किंचितही विश्वास नव्हता. मनोभावे हरिभजन करणारे परमेश्वराला प्राप्त करू शकतात, अन्य अवडंबराची बिलकुल गरज नाही अशी त्यांची दृढ धारणा होती.

आंबेडकरांचा जन्म इ. स. १८९१ मध्ये दि. १४ एप्रिलला झाला. त्यांचे पूर्ण नाव होते भीमराव रामजी आंबावाडेकर. त्यांच्या जन्माविषयी एक कथा आहे. रामजीचे काका साधू होते. त्यांनी रामजीला आशीर्वाद दिला होता की, तुझ्या कुळात एका थोर मुलाचा जन्म होईल व त्याची कीर्ति सर्व जगभर पसरेल. ह्यानंतर थोड्याच दिवसात भीमराव आंबेड-करांचा जन्म झाला. भीमराव केवळ पाच वर्षाचे असतानाच त्यांची आई स्वर्गवासी झाली.

## अस्पृश्यतेचे शल्य

भीमराव शाळेत शिकत असतानाच अस्पृश्यतेचे शल्य त्यांना सतत बोचत होते. आपल्या वर्गात ते इतर विद्यार्थ्यांच्या बरोबर बसू शकत नव्हते. इतरांप्रमाणे आपल्या हाताने घेऊन पाणी पिऊ शकत नव्हते, जेव्हा

दुसरा वरून पाणी टाकील तेव्हाच ह्यांना पाणी मिळे. परंतु त्याकरिताही एका हाताने त्यांना आपले तोंड झाकून घ्यावे लागे.

त्या लहान वयात कुमार आंबेडकरच्या हे लक्षात येईना की आपल्याशी लोक असे कां वागतात.

या व अशा अनेक अपमानांमुळे होणाऱ्या दुःखांनी त्याच्या कोमल मनावर खूप खोलवर परिणाम केला. त्यामुळे अस्पृश्यता हा हिंदू धर्मावर एक महान कलंक आहे हे लहान वयातही समजायला त्याला उशीर लागला नाही. हा कलंक साफ पुसून टाकण्याकरिता ते कटिबद्ध झाले.

लढाऊ वीरवृत्ती त्यांच्या रक्तात होतीच. उत्कृष्ट लढाऊ सैनिक म्हणून महारांची पूर्वीपासूनच ख्याती होती. बाबासाहेबांचे वडील सकपाल हे देखील तत्कालीन सैन्यात भरती झाले होते.

लहानपणापासून भीमराव दृढ निश्चयी होते. एके दिवशी धो धो पाऊस सुरू असताना बाल आंबेडकर आपल्या सवंगड्यांना म्हणाला, " मी तर आज अवश्य शाळेत जाणार " मित्र म्हणाले, " उगीच फुशारकी

मारू नकोस. ह्या एवढ्या पावसात तू काही शाळेत जाऊ शकणार नाहीस. तोंडाची वाफ कशाला दवडतोस ? आज मुसळधार वर्षा चालू असताना तुला शाळेत जाणे अशक्य आहे. पाऊस म्हणतो मी व तू म्हणतोस मी. निसर्गापुढे तुझा काय टिकाव लागणार ? " परंतु तेवढ्याही पावसात बाल भीमराव शाळेत गेल्यावरच शांत झाला व तेही छत्री न घेता.

## आंबावाडेकरचे आंबेडकर

भीमराव जेव्हा माध्यामिक शाळेत शिकत होते तेव्हा त्याच्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे एका ब्राह्मण शिक्षकाला ते विशेष आवडू लागले. त्यांनी भीमरावाचे आंबावाडेकर हे आडनाव वदलून आंबेडकर केले. तेव्हापासून आंबेडकर हेच नाव रूढ झाले.

भीमरावाच्या वडीलांनी पुढे दुसरे लग्न केले. त्यामुळे भीमरावाच्या मनावर एक विलक्षण परिणाम झाला. त्याने मनोमन प्रत्तिज्ञा केली की आजपासून मी स्वत:च्याच पायावर उभा राहीन व वडिलांच्या कमाईचा काडीमात्र आधार घेणार नाही. हे साध्य

करण्याकरिता महाविद्यालयातील उच्च आधुनिक शिक्षण घ्यावे व खूप खूप शिकावे हा एकमेव मार्ग त्यांच्या समोर मोकळा होता. त्याशिवाय गत्यंतर नव्हते.

ह्या वेळी त्यांचे वय काही फार मोठे नव्हते. पुढील शिक्षण मुम्बईला जाऊनच घ्यावे, असा त्यांनी विचार केला. पण अडचण समोर होती पैशाची. पैसा आणणार कोठून? मुम्बईला जाण्याकरिता पहिली आवश्यकता म्हणजे गाडीचे तिकीट. पैसा मिळणार कसा? तीन दिवस त्यांनी आपल्या चुलतीची चंची चोरण्याचा प्रयत्न केला व शेवटी ती चोरलीही पण त्यातून मिळाला केवळ अर्धा आणा. म्हणजे आजचे तीन पैसे. पण दुसऱ्याच दिवशी आपण केलेल्या दुष्कर्माचा त्यांना एवढा तीव्र पश्चात्ताप झाला व मन संकोचाने व लज्जेने भरून आले की त्या क्षणी त्यांनी दृढ निर्धार केला, 'माझ्या घामाचा पैसा हाच माझा पैसा. त्याकरिता केवढाही महान संघर्ष करावा लागला तरी बेहत्तर. कितीही कष्ट सोसावे लागले तरी त्याची तिळमात्र तमा बाळगायची नाही. दुसऱ्याच्या कष्टाचा पैसा, मग तो कुणा-

चाही असो, कसा म्हणून घ्यायचा नाही.' भीमरावांची केवढी ही भीष्म प्रतिज्ञा !

बाळपणापासूनच भीमरावांना वाचनाचे वेड होते. त्याचा त्यांना केव्हाच कंटाळा येत नसे. पैशाची उधारी करूनही त्यांचे वडील त्यांना पुस्तके विकत आणून देत व त्यांची नवनवीन पुस्तके वाचण्याची भूक शांत करण्याचा प्रयत्न करीत.

## हायस्कूलचे शिक्षण

मुंबईला जाऊन त्यानी एलफिन्स्टन हायस्कूल-मध्ये प्रवेश घेतला. त्यांच्या परिवाराला अशा एका मोहल्ल्यात जागा मिळाली की जेथे गरीब लोक राहत होते. सर्वांना एकाच खोलीत राहावे लागत असे. झोपणे, राहणे, अभ्यास व स्वयंपाक सर्व काही तेवढ्या एकाच खोलीत. दोघांना झोपायला आवश्यक एवढीही जागा नव्हती इतकी ती लहान होती. भीमराव लवकरच झोपून जात. त्यांच्या डोक्याच्या बाजूला एक पिठाची चक्की होती व पायाजवळ एक शेळी बांध-लेली असे. त्यांचे वडील रात्री दोन वाजेतो जागत असत व जेव्हा भीमराव झोपून उठत तेव्हा त्याच जागी

ते झोपू शकत. कांचेच्या शिशीचा तयार केलेला मातीच्या तेलाचा एक दिवा होता. त्या दिव्याच्या उजेडात ते अभ्यासाला बसत.

हायस्कूलमध्ये शिकत असताना त्यांना एक विचित्र अनुभव आला. तो ते आजन्म विसरले नाहीत. संस्कृत शिकण्याची त्यांची इच्छा होती. बाकीचे विद्यार्थी संस्कृत विषय घेऊ शकत पण ह्यांना मात्र, ते महार असल्यामुळे तो विषय घेण्याची शाळेचीच मनाई होती. विदेशी लोक हिंदू नसूनही संस्कृत शिकू शकत पण ह्यावर कोणी चकार शब्द बोलायला तयार नव्हता. भीमराव मात्र संस्कृत विषय घेऊ शकले नाहीत. ह्या घोर अन्यायाने त्यांच्या जखमेवर मीठ चोळले गेले.

परंतु पुढे जीवनांत भीमराव संस्कृत शिकल्याशिवाय राहिले नाहीत.

## प्रथमोध्याय

आंबेडकर मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले, त्या वेळी त्यांचे वय सतरा वर्षाचे होते. त्याच वर्षी मुंबईच्या भायखळा मार्केट मधील एका छपराखाली

रमाबाईंबरोबर त्यांचा विवाह झाला.

एलफिन्स्टन कॉलेजमधून ते इंटरमिजिएटची परीक्षा उत्तीर्ण झाले व इ. स. १९१२ मध्ये त्यांनी बी. ए. ची पदवी मिळविली.

इ. स. १९१३ मध्ये आंबेडकरांचे वडील स्वर्गवासी झाले. त्यावेळी ते वडोद्याच्या महाराजांकडे नोकरीला होते.

ह्याप्रमाणे त्यांच्या जीवनसंघर्षाचा एक अध्याय पूर्ण होऊन दुसरा सुरू झाला.

## अमेरिकेचा प्रवास

वडोद्याच्या महाराजांनी भीमराव आंबेडकरांना अत्युच्च शिक्षणाकरिता अमेरिकेला पाठविले.

अमेरिकेत आंबेडकरांना एका नवीन जीवनाचा अनुभव मिळाला. तेथे सर्वच क्षेत्रात कोणत्याही प्रकारची अस्पृश्यता त्यांना आढळली नाही. त्यामुळे त्यांचे मन अत्यंत प्रफुल्लित झाले. अमेरिकेतील वातावरणाने प्रभावित होऊन आपल्या एका मित्राला पाठविलेल्या पत्रात त्यांनी सुप्रसिद्ध आंग्ल नाटककार शेक्सपिअर

याच्या काही ओळी उद्धृत केल्या. त्या ओळीचा आशय असा होता की, 'प्रत्येक माणसाच्या जीवनात केंव्हातरी एखादी उत्तुंग लाट येते. ती ओळखून तिचा जर त्याने योग्य फायदा करून घेतला व ही सुवर्ण संधी हातची जाऊ दिली नाही तर ती लाट अनायासे त्याला भाग्योत्कर्षाच्या सर्वोच्च शिखराला अवश्य नेऊन पोचविते.'

आंबेडकरांनी अमेरिकेत पुष्कळ उच्च श्रेणीचे व विद्वत्ताप्रचुर प्रबन्ध लिहिले. एम. ए. व पीएच्. डी. ह्या पदव्याही प्राप्त केल्या.

दि. २१ ऑगस्ट १९१७ ला ते भारतात परत आले. आंबेडकरांच्या शिक्षणाबाबत एक उल्लेखनीय व ठळक गोष्ट अशी की भारतात त्यांनी इंग्रजी व फारशी भाषेचा अभ्यास केला. अमेरिकेत राजनीति-शास्त्र, नीतिशास्त्र, नृवंशविज्ञान, समाजशास्त्र आणि अर्थशास्त्र ह्या शास्त्रांचे अध्ययन करून अन्य किती-तरी विविध विषयांचे ज्ञान त्यांनी संपादन केले. 'डाक्टरेट' ही पदवी मिळविली. आपल्या शिक्षणाच्या काळात आंबेडकरांचे मन क्रांतिकारी विचा-रांनी भारून गेले होते. त्याचवेळी त्यांनी पक्का

निश्चय केला की, 'मी दलित जातीतील लोकांवर होणारा अन्याय दूर केल्याशिवाय क्षणभरही उसन्त घेणार नाही.' ह्या प्रकारे हिंदू समाजात एक क्रांती घडवून आणण्याची त्यांची इच्छा होती. परंतु ती घडविण्याकरिता स्वत:ची ज्ञानवृद्धी करणे त्यांना अत्यंत आवश्यक वाटले. ही फार महत्वाची गोष्ट होती म्हणूनच त्यांच्या विचारांना ज्ञान व विद्या यांचा आधार मिळाला. ह्याच मजबूत आधारामुळे भारताचे संविधान घडविण्याची महत्त्वपूर्ण भूमिका ते उत्कृष्टपणे निभावू शकले.

## पुनश्च अपमान

अमेरिकेहून ते डाक्टरेट घेऊन परत आले. वडोद्याला परतल्यानंतर त्यांची एका उच्च पदावर नेमणूक झाली. पण भारताच्या भूमीवर पाय ठेवता-क्षणीच अस्पृश्यतेच्या शल्याची आठवण त्यांना सतत बोचू लागली. त्याला कारणही तसेच घडले. जेव्हा ते वडोद्याला पोहोचले तेव्हा त्यांच्या स्वागताकरिता कोणीही गेले नाही. एवढेच नव्हे तर कार्यालयातील नोकर वर्ग देखील फाइली त्यांच्या हाती न देता समोर

फेकून देत असे. त्यांना कोणी प्यायला देखील पाणी नेऊन देत नव्हता. एवढ्या मोठ्या शहरात त्यांना राहायला घरही मिळाले नाही. ह्याबद्दल महाराजां-कडे त्यांनी तक्रार केली. पण त्याचा काही एक परि-णाम झाला नाही. ही गोष्ट येथेच थांबली नाही. अहिंदू लोक देखील त्यांच्याशी नीट व्यवहार करीत नव्हते.

ह्या सगळ्या गोष्टीचा परिणाम असा झाला की त्यांच्या मनात एक प्रकारची अंगार भडकली व त्या अवस्थेतच थोड्या दिवसांनी तेथून ते मुंबईला परत आले.

इ. स. १९२० मध्ये आंबेडकर बॅरिस्टर होण्या-करता लंडनला गेले. तेथील ब्रिटिश म्युझियमचे ग्रन्थालय फारच उत्कृष्ट आहे. ते सकाळी आठ वाजता उघडत असे. आंबेडकर तेथे दररोज आठ वाजता उपस्थित होत असत व सायंकाळी पाच वाजेपर्यंत पुस्तके वाचीत असत. लंडनमध्ये असनोदकर नावाच्या एका विद्यार्थ्याशी त्यांचा संबंध आला. तो तरुण चांगलाच श्रीमंत होता. त्याचे लक्ष शिकण्यात काही लागेना. एके दिवशी आंबेडकर त्याला म्हणाले, "तुझ्या पूर्वजांनी खूप पैसा मिळवून

ठेवला ह्यात मुळीच संशय नाही. पण मित्रा, थोडा विचार कर, 'दुर्लभं मानुषं जन्म' सहजासहजी न मिळणारा मनुष्य जन्म तुला लाभला आहे. या जीवनात तुझे काही ध्येय असायला पाहिजे. लक्ष्मीच्या दृष्टीने तू भाग्यवान आहेस. पण सरस्वती तुझी दासी थोडीच आहे की तुला वाटेल त्यावेळी ती तुझ्याकडे चालून येईल ? म्हणून ज्यावेळी ती भेटेल त्याचवेळी तिचा आशीर्वाद तू मिळवायला हवास."

इ. स. १९२२ मध्ये आंबेडकर बॅरिस्टर झाले व दुसऱ्याच वर्षी ते मायदेशी भारताला परत आले.

## 'मूक नायक'

अस्पृश्यांचा आवाज हा मामुली आवाज नसून ती गर्जना आहे, हे जाहीर करून त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांना व अपमानांना प्रकाशित करणे व सर्वांच्या समान अधिकारांकरिता लढत राहणे, ह्या उद्देशाने 'मूक नायक' नावाचे एक लहानसे वर्तमानपत्र सुरू झाले. आंबेडकरांनी ह्या प्रयत्नाला आपले समर्थन दिले. ह्या पत्रिकेच्या पहिल्याच अंकात त्यांनी लिहले की, " हिंदू समाज गगनचुंबी उंच मजल्यांच्या भव्य इमारती

प्रमाणे आहे. ह्यात चढण्याकरिता कसलाही जिना नाही व बाहेर निघण्याकरिता कसलाही दरवाजा नाही... एकीकडे हा समाज जड वस्तूत देखील देव आहे अशी श्रद्धा बाळगतो, तर दुसरीकडे असेही म्हणतो की समाजाचे अंगभूत काही लोक अस्पृश्य आहेत; हात लावण्याच्या देखील पात्रतेचे ते नाहीत."

आज मात्र हे चित्र काहींसे पालटले असून हिंदु-समाज अस्पृश्यतेला अनुचित मानू लागला आहे.

कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी अस्पृश्यांकरिता निःशुल्क शिक्षणाची व्यवस्था केली. व त्यापैकी पुष्कळांना नोकऱ्याही दिल्या.


इ. स. १९२४ मध्ये स्वातंत्र्यसेनानी वीर सावरकर यांची अंदमान कारागृहातून सुटका झाली व त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध लढण्याकरिता शिंग फुंकले. महात्मा गांधींनी देखील अस्पृश्यता नष्ट करण्याकरिता व्यावहारिक पावले उचलून उपाययोजना केली.

## चवदार तळे

क्षणोक्षणी व पदोपदी अस्पृश्यतेमुळे होणारा अन्याय

व अपमान ह्यांचा आंबेडकरांना मोठा कटू अनुभव आला होता. दलितांच्या उद्धाराकरिता इतरांकडे दयेची याचना करणे त्यांना मान्य नव्हते. एवढेच नव्हे तर ते त्यांना अपमानास्पद वाटले. 'उद्धारेदात्मनात्मानं' ह्या न्यायाने अस्पृश्यांचा उद्धार ते स्वतःच करू शकतात. इतर कोणीही येऊन त्यांना वर उचलू शकत नाही. इतरांच्या भरंवशावर कुणालाही न्याय मिळू शकत नाही. तो प्राप्त करण्याकरिता जे अन्यायाचे शिकारी बनले असतात त्यांना स्वतः लढावे लागते. न्याय मागून मिळत नसतो, तो लढून मिळवावा लागतो, असे त्यांचे मत होते.

मुंबई सरकारने पूर्वी असे एक बिल पास केलेले होते की सार्वजनिक विहिरी व तलाव सर्वांनाच उपयोगाकरिता मोकळे राहतील. ह्या बिलाच्या आधारावर कुलाबा जिल्ह्यातील महाड नगरपालिकेनेही ठराव पास केला होता की तेथील चवदार तळ्याचा उपयोग अस्पृश्यदेखील करू शकतात. पण तो ठराव फक्त सरकारच्या कागदोपत्री होता. त्याची अंमलबजावणी मात्र मुळीच होत नव्हती. डॉ. आंबेडकरांनी त्यातील पाणी घेऊन समानतेचे निशाण



मंत्रीपदाची



पथ घेताना

उंच करण्याचा निश्चय केला.

ह्याकरिता त्यांनी एक दिवस निश्चित केला. त्या दिवशी डॉ. आंबेडकरांनी सर्वांच्या अगोदर तळ्या–च्या पाण्याला स्पर्श केला व नंतर त्यांचे पुष्कळ अनुयायी ते पाणी प्यायले. त्यापूर्वी मात्र कोणीही अस्पृश्य त्या तळ्याजवळही फिरकू शकत नव्हता. हा सत्याग्रह करून डॉक्टरसाहेबांनी जाहीरपणे सिद्ध केले की, पाणी हे ईश्वराने सर्वांकरिताच निर्माण केले आहे.

इकडे ह्यानंतर दोनच तासात कोणीतरी सर्व गावभर अफवा पसरवून दिली की डॉक्टर आंबेडकरांचे साथी वीरेश्वराच्या मंदिरातही प्रवेश करतील. ह्यामुळे गावच्या लोकांनी डॉक्टरसाहेबांवर व त्यांच्या अनुयायांवर हल्ला चढविला व त्यामध्ये डॉ. आंबेडकर जखमी झाले.

परतु ह्या घटनेने भारताच्या सामाजिक जीवनाला एक नवीनच वळण दिले व जीवनाचा नवीन अध्याय सुरू केला. पुष्कळशा विचारी हिंदू नेत्यांनी महाड येथील लोकांच्या ह्या कृत्याची निंदा केली. सार्वजनिक विहिरी व तळ्यांमधून पाणी घेण्यात कसलीही

अनुचित गोष्ट अस्पृश्य करीत नाहीत, असे जाहीरपणे म्हणायला त्यांनी सुरुवात केली.

इ. स. १९२७ मध्ये एक विशाल संमेलन झाले. हिंदू धर्मात जातीपातीचा भेदभाव मुळीच न मानता सर्व जातींच्या लोकांना मंदिरात पुजारी होण्याची अनुमति असावी, असा ठराव त्या संमेलनात झाला.

चवदार तळ्याचा झगडाही न्यायालयात गेला होता. न्यायालयाने निर्णय दिला की तलाव ही सार्वजनिक संपत्ति आहे.

## प्रगतीची पावले

ज्या अस्पृश्यांचा शतकाशतकापासून छळ होत आला, त्यांना न्याय मिळणे अत्यंत आवश्यक होते. ह्याकरिता डॉ. आंबेडकरांनी निश्चित स्वरूपाच्या योजना सुचविल्या. उदाहरणार्थ मंदिरात सर्व हिंदूंचा प्रवेश झाला पाहिजे; विधानसभेत अस्पृश्यांचे अधिक प्रतिनिधी असावेत व त्यांना सरकारने नियुक्त न करता लोकांनीच निवडून द्यावे, अस्पृश्यांना आहे त्याहून अधिक संख्येत सरकारने सैन्यांत व पोलिस खात्यात भरती करावे.

## गोलमेज परिषदेत

भारतापुढे असलेले प्रश्न सोडविण्याकरिता विचार-विनिमय करण्यासाठी ब्रिटिश सरकारने कितीतरी भारतीय नेत्यांना वेळोवेळी आमंत्रित केले. ह्याकरिता अनेकदा लंडनला संमेलने झाली. ह्या प्रकारच्या संमेलनाला राउंड टेबल कान्फरन्स किंवा गोलमेज परिषद म्हटले जाते. महात्मा गांधींनी देखील ह्यात भाग घेतला. ह्या गोलमेज परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांनी मोठ्या त्वेषाने भाषण देऊन सरकारच्या विरुद्ध तीव्र नापसंती प्रकट केली. त्यांनी म्हटले की मागासलेल्या वर्गातील लोकांबरोबर समानतेचा व्यवहार होत नाही. इंग्रज सरकार देखील अन्य हिंदूंच्याच पावलावर पाऊल टाकून चालत आले आहे. त्या काळी महात्मा गांधींची लोकप्रियता शीगेला पोचली होती. देशातील लाखोकरोडो लोक त्यांनी सांगितलेला मार्ग मोठ्या श्रद्धेने चोखाळीत होते. अस्पृश्यांना न्याय कसा मिळेल ह्याविषयीच्या महात्मा गांधीच्या विचारांचा डॉ. आंबेडकरांनी उघडपणे विरोध केला. डॉक्टरांच्या बुद्धीला गांधींचे जे विचार पटले व हितावह वाटले त्या विचारांचे डॉक्टरांनी समर्थन देखील केले.

इ. स. १९३१ मध्ये झालेल्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत त्यांनी अस्पृश्यांकरिता वेगळा मतदार संघ प्राप्त करून घेतला. ह्याला अनुसरून हरिजन मतदार आपले अलग प्रतिनिधि निवडू शकत होते.

## महात्मा गांधींचे उपोषण

पृथक मतदार संघामुळे हरिजन हिंदूपासून अलग होतील अशी महात्मा गांधींची भावना होती. अगोदरच छिन्नविच्छिन्न झालेला हिंदू समाज, आणखी विभागला जाईल म्हणून त्यांनी या पृथक निर्वाचनाच्या निर्णयाविरुध्द उपोषण सुरू केले. आवश्यकता पड-ल्यास मी आमरण उपोषण देखील करीन, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

महात्माजींच्या उपोषणामुळे सर्व देश काळजीच्या महासागरात बुडून गेला.

काँग्रेसचे वरेच पुढारी महात्माजींचा जीव वाच-विण्याकरिता डॉ. आंबेडकरांजवळ जाऊन पोचले. वाटाघाटीला प्रारंभ झाला.

डॉ. आंबेडकरांनी त्यांना प्रश्न केला, "जेव्हा ईसाई व मुसलमान ह्यांना पृथक मतदानाचा

अधिकार मिळाला तेव्हा महात्माजींनी त्याच्या विरोधात उपोषण कां केले नाही ? आता केवळ हरिजनांनाच अधिकार मिळतात म्हणून महात्माजींनी उपोषण कां करावे ? अस्पृश्यांना पृथक मतदानाचा अधिकार देण्याची तुमची इच्छा नसेल तर दुसरा कोणताही तोडगा सुचवा. पण, केवळ महात्माजींचे प्राण वाचविण्याकरिता मी मागासलेल्या जातींच्या हितांचा बळी देण्यास बिलकुल तयार नाही." नंतर डॉ. आंबेडकरांनीच पुढील तोडगा सुचविला. " इंग्रजांनी जितक्या जागा हरिजनांना दिल्या आहेत त्यापेक्षा जास्त जागा हरिजनांकरिता विधान मंडळात राखून ठेवायला जर तुम्ही तयार असाल तर मी वेगळ्या मतदार संघाची मागणी सोडून देतो. "

सरते शेवटी वाटाघाटी करण्याच्या हेतूने जे पुढारी डॉ. आंबेडकराकडे पोचले होते ते व डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये एक करार झाला. त्यानुसार विधान-मंडळात हरिजनांच्याकरिता शेकडा दहा जागा राखून ठेवण्याचे ठरले. ह्याच अटीवर डॉ. आंबेडकरांनी पृथक निर्वाचनाची आपली अट सोडून दिली व महात्माजींनीही उपोषण सोडले.

ह्या प्रसिद्ध कराराला पूना करार किंवा पूना पॅक्ट म्हटले जाते. मागासलेल्या जातीच्या संघर्षमय वाटचालीत हा करार ऐतिहासिक महत्त्वाचा आहे.

## धर्म हवा, जाती नको

डॉ. आंबेडकरांची अशी दृढ धारणा होती, की अस्पृश्यता ही जातिवादाचीच एक शाखा आहे आणि जोपर्यंत जातिवाद नष्ट होत नाही तोपर्यंत अस्पृश्यता नष्ट होऊ शकत नाही. जातिवाद समाप्त करण्याकरिता राजनैतिक शक्ती अत्यंत आवश्यक आहे, याचीही जाणीव त्यांनी दिली. मनुष्याच्या सर्वांगीण विकासाकरिता धर्म नितांत आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. परंतु जे लोक धर्माच्या नांवावर इतरांना पशूप्रमाणे वागवितात त्या लोकांविरुद्ध त्यांनी बंड पुकारले. अशा लोकांविरुद्ध त्यांचा विद्रोह होता. यामुळे पुष्कळांनी त्यांच्यावर कठोर टीका केली. काही वर्तमानपत्रे देखील त्यांच्या विरुद्ध लिहीत राहिली. पुष्कळदा तर त्यांच्या जीवाला धोकाही निर्माण झाला.

स्वतःच्या अनुभवावरून डॉ. आंबेडकर पक्के

जाणून होते की, मनुष्य कितीहि प्रतिभाशाली असला तरी जातीवादामुळे त्याचा पूर्ण विकास होऊ शकत नाही व समाजात तो आपल्या तेजाने चमकू शकत नाही. त्याची जात समोर करून लोक त्याला दुबळे बनवीत असतात. जातीवादाविरुद्ध ते आजन्म लढत राहिले. आजही कितीतरी लोक संकुचित विचारांचे आहेत. त्यामुळे अवशिष्ट समाजाकडून अस्पृश्यांना न्याय मिळणे किती कठीण होऊन बसले आहे हे पाहून त्यांचे मन अतिशय प्रक्षुब्ध होत असे. हिंदू धर्माचा सर्वस्वी त्याग करणे हेच श्रेयस्कर होईल असे म्हणण्यापर्यंतही त्यांची मजल गेली.

धर्मांतराची ही त्यांची घोषणा ऐकताक्षणीच मुसलमान मौलवी आणि ईसाई पाद्री व मिशनरी लोक त्यांना आपापल्या धर्माकडे ओढण्याचा प्रयत्न करू लागले. डॉ. आंबेडकरांना त्यांनी आश्वासन दिले की जो अस्पृश्य आपला धर्म सोडून आमच्या धर्माचा एकटा किंवा समुदायाने स्वीकार करील त्याला आमच्या समाजात समानतेची वागणूक व बरोबरीचा दर्जा दिला जाईल.

## आधुनिक मनू

भारत १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झाला. डॉ. आंबेडकर भारताचे प्रथम कायदेमंत्री झाले. ह्या गोष्टीचे सर्व देशभर एक मताने स्वागत झाले. त्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली.

भारताला स्वतंत्रता तर मिळाली पण ह्या देशाचे शासन कसे चालविले जावे हे अजून निश्चित ठरायचे होते. देशाला उपयुक्त कायदे कसे बनविले जावे, सरकार कसे चालवावे, न्यायालयाचे कामकाज कसे चालवावे, ह्या सर्व गोष्टींचा निर्णय अजून व्हायचा होता व त्या संबंधीचे नियम तयार केले जात होते. भारताच्या घटनेत आंबेडकरांनी वरील सर्व गोष्टींचे उत्तर दिले आहे व त्याबद्दल नियमही बनविले आहेत.

भारताचे संविधान बनविणे म्हणजे गंमत नव्हती. जगातील सर्व देशांच्या संविधानांचे अध्ययन, कायद्याचे सखोल ज्ञान, भारताच्या इतिहासाचा गाढ परिचय, धैर्य, विभिन्न मतांना मापण्याची समतोल बुद्धिमत्ता ह्या सर्व गुणांची अत्यंत आवश्यकता होती.

दि. २९ ऑगस्ट १९४७ ला भारताचे संविधान बनविण्याकरिता एक समिती स्थापन झाली. डॉ. आंबेडकर ह्या समितीचे अध्यक्ष निवडले गेले. समितीचे एक सदस्य श्री. टी. कृष्णमाचारी यांनी म्हटले आहे की, "समिती सात सदस्यांची बनलेली होती. पण एकाने राजीनामा दिल्यामुळे त्याच्या जागी दुसऱ्याला नियुक्त करण्यात आले. एक सदस्य मरण पावला पण त्याच्या जागी कोणाचीही नियुक्ती केली नाही. आणि एक सदस्य सरकारी कामकाजात फारच व्यस्त राहत असे. दोन सदस्य असे होते की जे आजारपणामुळे दिल्लीपासून फार दूर राहत होते. परिणामत: एकट्या डॉक्टरसाहेबांवरच घटनेचा मसूदा तयार करण्याची सर्व जबाबदारी येऊन पडली. असे असतानाही त्यांनी जे काम केले ते अत्यंत प्रशंसनीय आहे."

डॉ. आंबेडकरांनी दि. ४ नोव्हेंबर १९४८ ला घटनेचा मसूदा विधिमंत्री ह्या नात्याने संविधान सभेसमोर सादर केला. त्यांनी त्यावेळी पुष्कळ प्रश्नांची समाधानकारक उत्तरेही दिली.

अस्पृश्यता निवारणाशी संबंधित असलेला संविधानाचा तेवढा सर्व भाग दि. २९ नोव्हेंबर १९४८ ला

स्वीकारण्यात आला. डॉ. आंबेडकरांच्या संघर्षाचे सुपरिणाम ह्याची देही ह्याची डोळा त्यांना पाहायला मिळाले. केवढे त्यांचे भाग्य ! देशाच्या सामाजिक जीवनाचा एक नवीन अध्याय प्रारंभ झाला. भारतीय संविधानासंबंधी प्रश्नोत्तररूपाने जी चर्चा झाली त्यावेळी उत्तरादाखल बोलताना डॉ. आंबेडकरांनी काढलेले पुढील शब्द लक्षात ठेवायला हवेत.

" स्वजनांच्याच विश्वासघातामुळे भारताने आपले स्वातंत्र्य गमाविले. महंमद बिन कासीमने सिंधच्या दाहीर राजाचा युद्धात पराभव केला, ह्याचे एकमेव कारण सिंधुराज दाहीराच्या सेनापतींनी कासीमच्या लोकांशी आपल्याच राजाच्या विरुद्ध संगनमत केले. आपल्या राजाकरिता ते लढलेच नाहीत. पृथ्वीराजाच्या विरुद्ध लढण्याकरिता महंमद घोरीला जयचंदानेच आमंत्रित केले होते. जेव्हा हिंदूकरिता शिवाजी महाराज मोगलांशी लढत होते तेव्हा काही अन्य मराठे व राजपूत सरदार मोगलांच्या बाजूने स्वकीयांविरुद्ध लढत होते. जेव्हा शीख इंग्रजाविरुद्ध लढत होते तेव्हा हिंदूचे पुढारी चूप बसले. त्यांनी काहीही केले नाही. हे विश्वासघाताचे प्रकार पुढे व्हायला

नकोत. म्हणून प्रत्येकाने अशी प्रतिज्ञा करायला हवी की शरीरात रक्ताचा शेवटला थेंब असेतो भारताच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याकरिता मी लढत राहीन."

दि. २६ नोव्हेंबर १९४९ ला संविधान सभेने भारतीय घटनेचे प्रारूप स्वीकृत केले.

डॉ. आंबेडकरांचा जन्म महार जातीत झाला होता. अस्पृश्य असल्यामुळे त्यांना दूर दूर ठेवण्यात आले होते. त्यांच्या केवळ स्पर्शाने पाणी अपवित्र व अपेय होते, असे मानले जाई. परंतु आपली असामान्य प्रतिभा, विलक्षण विद्वत्ता व प्रबळ इच्छाशक्ति ह्यांच्या भरोशावरच समाजातील उन्नतीचे व प्रतिष्ठेचे अनन्य श्रेष्ठ असे स्थान त्यांनी प्राप्त केले. 'मनुस्मृती' चा निर्माता मनू हा प्राचीन काळी एक महान कायदे-पंडित होऊन गेला. धर्मशास्त्रावरील 'मनुस्मृती' हा प्रमाणभूत ग्रन्थ जगात अद्वितीय ठरला आहे. त्याचप्रमाणे अर्वाचीन काळात डॉ. आंबेडकरांनी भारतीय संविधान निर्माण करून नाव मिळविले.

डॉ. आंबेडकरांची पहिली पत्नी रमाबाई स्वर्ग-वासी झाली. त्यांच्या मृत्यूनंतर डॉ. आंबेडकरांनी

डॉ. शारदा कबीर हिच्याशी लग्न केले. वैद्यकीय उपचाराकरिता ज्या नर्सिंग होममध्ये डॉ. आंबेडकर काही दिवस राहिले, त्याच इस्पितळात डॉ. शारदा कबीर रुग्णसेविकेच्या कामावर होत्या.

इ. स. १९५१ मध्ये डॉ. आंबेडकरांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

## त्यागपत्रानंतर

इ. स. १९५२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकी-मध्ये लोकसभेच्या जागेकरिता ते उभे होते. त्यात एका काँग्रेसच्या उमेदवाराने त्यांना पराजित केले. त्यांच्या ह्या पराभवामुळे सर्व देशाला आश्चर्याचा धक्का मिळाला. काही दिवस लोटल्यानंतर राज्य सभेतील एका जागेवर त्यांची नियुक्ति करण्यात आली. तरी पण त्यांना असे वाटतच होते की सरकार हरिजनांना न्याय देत नाही. आणि त्यामुळे त्यांनी सरकारला धारेवर धरायलाही कमी केले नाही. इ. स. १९५३ मध्ये सरकारने संसदेत एक बिल आणले. ह्या बिलात स्पृश्यास्पृश्यतेचा व्यवहार करणाऱ्याला शिक्षा करण्याची तरतूद केली होती. कैद,

द्रव्यरूपाने दण्ड, सरकारी नोकरीवरून काढून टाकणे व धंद्याचा परवाना मिळाला असल्यास तो रद्द करणे, असे ह्या शिक्षेचे स्वरूप होते.

## बौद्धधर्माचा स्वीकार

भारतीय संविधानाचे काम पूर्ण झाले. तेव्हापासूनच डॉक्टरसाहेबांचे मन भगवान बुद्धाकडे झुकले होते. त्यांना न्याय व शांति ह्या दोन गोष्टींची फार तहान लागली होती. इ. स. १९५० च्या बौद्ध संमेलनात भाग घेण्याकरिता ते सिलोनला गेले.

त्यांच्या मनात असलेली कटुता अधिकाधिक तीव्र होत गेली. असे असूनही ते ईसाई किंवा इस्लामी धर्म स्वीकारायला तयार नव्हते.

अखेर त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचा पक्का निश्चय केला. हा त्यांच्या जीवनातील फार मोठा, ऐतिहासिक स्वरूपाचा निर्णय होय. तो त्यांनी फार खोलवर विचार करून घेतला होता.

त्यांनी बौद्ध धर्माचीच निवड कां केली ? इतर धर्म नव्हते काय ?

ह्याचे उत्तर त्यांनी आपले मित्र श्री. दत्तोपंत ठेंगडी ह्यांना पुढील शब्दात दिले होते. " ही माझ्या जीवनाची सायंकाळ आहे. आजकाल आपल्यावर जगातील निरनिराळया देशांतून अनेक प्रकारच्या विचारांचे आक्रमणच होत आहे. संघर्षरत लोकांना ह्या देशातील प्राचीन प्रमुख प्रवाहापासून दूर करून बाह्य देशांकडे ओढण्याचे फार मोठे प्रयत्न सुरू आहेत. अस्पृश्यता, दारिद्रय व विषमता ह्यांनी अत्यंत त्रस्त झालेले माझे स्वत:चे कितीतरी सोबती आहेत. ते तर ह्या लोंढयावरोबर वाहून जाण्यास अनावर होऊन अगदी तयार आहेत. त्यांची अशी अवस्था आहे तर इतरां विषयी मी काय सांगू शकणार? वास्तविक त्यांनी ह्या देशातील राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहापासून अलग होऊ नये. मला तर त्यांचे मार्गदर्शन केलेच पाहिजे. त्यांच्या आर्थिक व राजनैतिक जीवनात देखील काही परिवर्तन घडवून आणावे लागेल. म्हणून मी बौद्ध धर्माचा, एका भारतीय धर्माचाच स्वीकार केला."

आपल्या देशात एक जीवनप्रणाली आहे. ती हजारो शतकांपासून अखंड प्रवाहासारखी अविरत वाहत

आली आहे. बौद्ध धर्म त्या प्रणालीच्या विरुद्ध नाही. मागासलेल्या लोकांना त्यांच्यावर प्रतिदिन होणाऱ्या अन्यायांच्या विरुद्ध विद्रोह करावाच लागेल; उठाव करावा लागेल. पण हिंदू समाजाची ज्वलंत समस्या असलेला अस्पृश्यततेचा प्रश्न अशा प्रकारे सोडवावा लागेल की ज्यामुळे भारताच्या इतिहासाला व संस्कृतीला हानी पोचणार नाही. डॉ. आंबेडकर यांच्या दृढ संकल्पाचा आधार हाच होता.

आर्य ह्या देशात वाहेरून आले व त्यांनी येथील मूल निवासी असलेल्या दस्यूंना (द्रविडांना) पराभूत केले हा सिद्धान्त त्यांना मुळीच मान्य नव्हता. ही गोष्ट मानायला वेदात कसलाच आधार किंवा प्रमाण मिळत नाही. ' आर्य ' शब्द वेदात जवळ जवळ ३३ किंवा ३४ वेळा तरी आला आहे. तेथे हा शब्द 'श्रेष्ठ', महान किंवा प्रशंसेला पात्र ह्या अर्थी एक विशेषण म्हणून आला आहे. महाभारतातही म्हटले आहे. की " सर्वच वर्णांत व आश्रमांत दस्यु मिळू शकतात." ह्यावावत डॉ. आंबेडकरांचेही विचार असेच होते.

## स्वप्न साकारले

आम्ही ज्यांना अस्पृश्य म्हणत आलो त्यांना न्याय

व समानता प्राप्त करून देण्यात डॉक्टरांनी आपले सर्व जीवन खर्ची घातले. ते नेहमी म्हणायचे. " जोपर्यंत मी दलितोद्धाराचे काम पूर्ण करीत नाही तोपर्यंत मधूनच मला ईश्वराने परलोकी उचलून नेऊ नये. आणि अस्पृश्यता हा कायद्याच्या दृष्टीने गुन्हा घोषित करण्यात आला, हे त्यांनी प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिले. अस्पृश्यांना राजनैतिक समानता प्राप्त झाली. त्यांना सामाजिक समानता देखील मिळायला पाहिजे हाही विचार देशात सर्वत्र प्रभावीपणे पसरू लागला; दिवसेंदिवस वाढू लागला.

इ. स. १९५१ पासून डॉ. आंबेडकरांची प्रकृती खालावत गेली. तरी देखील त्यांनी परिश्रम करणे सोडले नाही. ते म्हणत की, " माझ्यासमोर एवढा कामाचा ढीग पडला असताना मी माझ्या अस्वास्थ्याला मुळीच शरण जाणार नाही."

दि. ६ डिसेंबर १९५६ ला त्यांचे देहावसान झाले. हजारो–लाखो लोकांनी त्यांच्या शवयात्रेत भाग घेतला व त्यांचे अंत्यदर्शन घेतले. हजारो डोळ्यांनी आंसू ढाळले. लाखो मुखांनी त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली. त्यांना ज्यावेळी अग्नि दिला त्यावेळी पाच लाख

जनसमुदाय उपस्थित होता.

## सखोल व्यासंग

डॉ. आंबेडकरांना पुस्तकांची फारच आवड होती स्वतःच्या निवासस्थानातील एका दालनाला त्यांनी 'राजगृह' असे नाव दिले होते. वास्तविक ते त्यांचे पुस्तकालय होते. जेव्हा त्यांचे डोळे खराब झाले व त्यांना काही दिसेना, तेव्हा आपल्याला आता पुस्तके वाचता येणार नाहीत, ह्या एकाच गोष्टीचे त्यांना अत्यंत दुःख झाले. जेव्हा जेव्हा त्यांना परदेशी जावे लागले तेव्हा तेव्हा तेथून परत येताना ते पुस्तकांचाही ढीग विकत आणायचे. एकदा न्यूयार्कला त्यांनी दोन हजार पुस्तके खरेदी केली.

त्यांनी स्वतःही कांही पुस्तके लिहिली आहेत. 'अनटचेबल्स' (अस्पृश्य), 'बुद्ध अँड हिज गॉस्पेल' (बुद्ध व त्यांचा उपदेश), रिव्होल्युशन अँड काउन्टर रिव्होल्युशन इन इंडिया (भारतातील क्रान्ति व प्रति-क्रान्ति), 'बुद्ध अँड कार्ल मार्क्स', (बुद्ध व कार्ल मार्क्स) आणि 'रिडल ऑफ हिंदूइझम ( हिंदुत्वाचे गूढ ) इ. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथावरून त्यांचा

विविध विषयांचा सखोल व्यासंग व अभ्यासाची व्याप्ती यांची कल्पना येईल. ते एक स्वतंत्र विचाराचे लेखक व महान तत्त्वचिंतक होते.

काही दिवसाकरिता ते औरंगाबादला प्राचार्य होते. कॉलेजच्या एवढ्या मोठ्या आवारात एक देखील झाड नाही हे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी हा एक नियमच केला की जो कोणी त्यांना भेटायला येईल त्याने प्रथम झाडाचे रोप लावावे व नंतर भेटावे. रोप न लावणाऱ्याला ते भेटतच नसत. युक्ति उपयुक्त ठरली. पाहता पाहता कालेजच्या आवारात शंभरापेक्षा जास्त झाडे उभी झाली.

एकदा त्यांना छात्रावासासमोर झुडपे वाढलेली दिसली. त्यांनी कोणाला काही एक न म्हणता, स्वतः हातात कुदळी पावडे घेतले व ती झाडी स्वच्छ केली.

## अपार करुणा

वास्तविक त्यांचा दयाळू स्वभाव हेच त्यांच्या क्रोधाचे मूळ होते. ह्याच एका कारणामुळे दयासागर म्हणून प्रसिद्ध असलेल्या भगवान बुद्धाच्या चरणी शरण जाऊन त्यांनी आपले जीवन सार्थकी लावले.

मनुष्य असूनसुद्धा पशूपेक्षा निकृष्ट जीवन व्यतीत करणाऱ्या त्या दीन दुःखी लोकांची दशा पाहून त्यांच्या हृदयाचे पाणी होत असे.

मनुष्याला धर्माची आवश्यकता आहे, असा स्वतः त्यांचा प्रत्यक्ष अनुभव होता. त्यांचे असे म्हणणे होते की जगण्यासाठी मनुष्याला केवळ अन्न पुरेसे नाही. तर त्याला देवाने जी बुद्धी दिली आहे तिच्याकरिताही काही खाद्य हवे. धर्म मनुष्याला भावी उज्ज्वल जीवनाची शाश्वती देतो व त्याला कर्मशील बनवितो.

त्यांच्या अनुयायामध्ये एक वृद्ध सज्जन होते, एकदा ते डॉक्टर साहेबांकडे गेले व म्हणाले, "मी परमेश्वरापासून काही व्रत घेतले आहे व ते पूर्ण करण्याकरिता मला तुमची अनुमती पाहिजे." डॉक्टरसाहेबांनी त्यांच्या म्हणण्याचा आशय ओळखला व किंचित हसून म्हणाले, "तुम्हाला कोणी सांगितले की माझा ईश्वरावर विश्वास नाही म्हणून ? जा तुमच्या इच्छेप्रमाणे तुम्ही वागा." एकदा एक म्हातारी रात्री दोन वाजता आली व त्यांच्या दरवाज्यावर खटखट आवाज केला. सांगताना ती रडत होती, "माझे पती फारच आजारी आहेत. बारा तास

झाले मी त्यांना सरकारी दवाखान्यात दाखल करण्याचा सतत प्रयत्न करीत आहे. तेथील अधिकारी म्हणतात, सर्व जागा भरल्या आहेत. एकही जागा रिकामी नाही. डॉ. आंबेडकर लगेच तेवढ्या रात्री तिला घेऊन इस्पितळात गेले व तिच्या पतीला भरती करून घरी परतले.

एकदा असाच एक कालेजचे शिक्षण घेत असलेला अत्यंत गरीब विद्यार्थी रडत रडत डॉक्टराकडे आला. त्यावेळी डॉक्टरांनी कालेजच्या प्राचार्यपदाचा राजीनामा दिलेला होता. मागील दोन वर्षपर्यंत त्याला छात्रवृत्ती सतत मिळत होती. पण चालू शेवटच्या वर्षाला न जाणो कदाचित ती छात्रवृत्ती मिळणार नाही असा त्याला भारी संशय होता. डॉ आंबेडकरांनी त्याची ती दु:खपूर्ण कहाणी ऐकली. ते अत्यंत दु:खी झाले त्यांनी त्याचे सांत्वन केले. प्रेमाने त्याला बसविले भोजन दिले व जाता जाता पन्नास रुपये त्याच्या हाती दिले. त्याच्या पाठीवर हात फिरवीत ते म्हणाले, "पुन्हा अडचण पडली तर मला येऊन सांग वरं ! आता मुळीच काळजी करू नकोस."

डॉ. आंबेडकर एकदा अत्यंत आजारी होते. त्याच

वेळी त्यांच्या वागवानाचीही प्रकृती गंभीर झाली. एका मनुष्याला वरोवर घेऊन डॉक्टरसाहेब काठीच्या आधारे तशा स्थितीतही माळ्याला भेटायला त्याच्या घरी गेले. कर्मधर्म संयोगाने त्याचवेळी माळी देखील याच विचाराने त्रस्त होता की, "मला जर मरण आले तर माझ्या मागे माझ्या पत्नीची काळजी कोण घेईल?" डॉ. आंवेडकर भेटायला येताच त्यांना माळ्याने तोच प्रश्न केला. तेव्हा माळ्याला धीर देऊन डॉक्टर म्हणाले, "अरे वावा रडतोस कशाला? प्रत्येकालाच कुण्यातरी दिवशी मरावयाचे आहे. मी देखील एके दिवशी मरणारच आहे. धीर सोडू नकोस. मी तुझ्याकरिता आत्ताच औषध पाठवून देतो, म्हणजे लगेच तुला वरे वाटेल व तुझी प्रकृती निश्चत सुधारेल." ते परत गेले व माळ्याकरिता त्यांनी औषध पाठविले.

या भेटीच्या दुसऱ्याच दिवशी झोपेत असतांनाच त्यांचा प्राण गेला.

## पुरुषसिंह

सर्वाहून हीन समजल्या जाणाऱ्या जातीत डॉ. आंबे-



“ धीर सोडू नकोस, मी तुझ्याकरिता आत्ताच औषध पाठवून देतो. ”

डकरांचा जन्म झाला. लोकांची त्यावेळी अशी भावना होती की त्यांना प्यायला पाणी दिल्याने देखील आपल्याला पाप लागेल आणि एखाद्या वाहनात जर ते वसले, तर ते वाहनही मलिन होऊन जाईल. पण याच व्यक्तीने देशाचे संविधान वनविले. त्यांचे सर्व जीवन संघर्षात गेले. प्रेमाने व आदराने लोक त्यांना वावासाहेव म्हणतात, यात विलकुल आश्चर्य नाही. जीवनात अशाच उद्योगी व वीर पुरुषाला यशःश्री माळ घालते. सुभाषितकारानेही असेच म्हटले आहे. "उद्योगीनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः" शेवटल्या श्वासापर्यंत त्यांनी समानता, न्याय व मानवता याकरिता सतत लढा दिला.

□ □

BVBK-0401322

शाखा.

9322 दि-६।१।८२